**सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**
सोलापूर पुणे महामार्ग, केगांव,
**सोलापूर** - ४१३ २५५ (महाराष्ट्र राज्य)
website: http://su.digitaluniversity.ac
Fax : 91-0217-2744777

**SOLAPUR UNIVERSITY, SOLAPUR**
Solapur Pune National Highway, Kegaon,
**Solapur** - 413 255 (Maharashtra)
EPABX: 0217-2744763, 66,67 Ext-122
Email : bcudsu@gmail.com

**जा.क्र. सोविसो/मविविमं/संलग्नता/** 3782

**दिनांकः** 2 1 JUL 2015

**प्रति,**
**मा.प्राचार्य/संचालक/सचिव,**
**सर्व संलग्नित महाविद्यालये,**

**विषयः-** **आपल्या महाविद्यालयात विनामूल्य स्पर्धा परीक्षा कार्यशाळेचे आयोजन करण्याबाबत.**

**संदर्भः-** मा.संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख आयएएस अकादमी, अमरावती यांचे दि.१२/०७/२०१५ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन, उक्त संदर्भिय पत्र आपल्या माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित करण्यात येत असून सदर पत्राचे अवलोकन व्हावे. डॉ.पंजाबराव देशमुख आयएएस अकादमी, अमरावती या संस्थेने महाराष्ट्रातील विद्यार्थी बहुसंख्येने प्रशासनात जावीत यासाठी महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयात स्पर्धा परीक्षेबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती करण्यासाठी **विनामूल्य स्पर्धा परीक्षा कार्यशाळा** घेण्याचे ठरविले आहे. या उपक्रमासाठी संस्थेचे तज्ञ मार्गदर्शक स्वतः विविध महाविद्यालयात जाऊन कोणतेही मानधन न घेता स्पर्धा परीक्षा कार्यशाळा घेणार असल्याचे कळविले आहे. तरी सोबतचे संदर्भिय पत्र अवलोकनी घेवून त्यानुसार आपण आपल्या महाविद्यालयात या स्पर्धा परीक्षा कार्यशाळेचे आयोजन करावे.

सदर परिपत्रक विद्यापीठाच्या http://su.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Circulars/Notice या मथळ्याखाली उपलब्ध आहे.

आपला विश्वासू,

**[संचालक]**
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

**प्रतः प्रा.डॉ. नरेशचंद्र काठोळे, संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख आयएएस अकादमी, अमरावती.**



sudhir

# डॉ. पंजाबराव देशमुख आयएएस अकादमी, अमरावती

जिजाऊ नगर, महापौराच्या बंगल्यासमोर, विद्यापीठ रोड, कॅम्प अमरावती
Mob. ९८९०९९६७००३
Email. iasmission@gmail.com, web site : www.iasmission.com, facebook - Nareshchandra kathole

**IAS मिशन**

दि. १२.०७.२०१५

प्रति,

मा. कुलगुरु,
सोलापूर विद्यापीठ,
सोलापूर.

विषय : आपल्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या विविध महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा कार्यशाळा हा उपक्रम राबविण्याबाबत.

महोदय,

डॉ. पंजाबराव देशमुख IAS अकादमी ही महाराष्ट्रातील विनामूल्य सेवा देणारी प्रतिष्ठित संस्था असून आमच्या उपक्रमात आतापर्यंत १६९ IAS, IPS, IRS, सनदी व राजपत्रित अधिकारी सहभागी झालेले आहेत. आमची अकादमी मिशन IAS हा उपक्रम गेल्या १५ वर्षापासून विनामूल्य राबवित आहे. यावर्षी अमरावती शहरातून ७ विद्यार्थी केंद्रीय लोकसेवा आयोगाची IAS ही परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत.

महाराष्ट्राची केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या IAS या परीक्षेतील टक्केवारी वाढविण्यासाठी आमच्या संस्थेने संपूर्ण महाराष्ट्रातील विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या विविध महाविद्यालयात विनामूल्य स्पर्धा परीक्षा कार्यशाळा हा उपक्रम राबविण्याचे ठरविले आहे. या उपक्रमासाठी आमच्या संस्थेचे तज्ज्ञ मार्गदर्शक येऊन विद्यार्थ्यांना IAS, MPSC या व इतर परीक्षांबाबत सविस्तर मार्गदर्शन करतील. त्यासाठी मानधन आकारण्यात येणार नाही.

आपण आपल्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या विविध महाविद्यालयात विनामूल्य स्पर्धा परीक्षा कार्यशाळा हा उपक्रम राबवावा यासाठी मी हे पत्र आपणास लिहित आहे. आपण एक परिपत्रक काढून आपल्या अधिकार क्षेत्रातील विविध महाविद्यालयात हा उपक्रम राबविण्यासाठी पुढाकार घ्यावा व महाराष्ट्राची IAS परीक्षेतील टक्केवारी वाढविण्यासाठी सहकार्य करावे ही विनंती. आपल्या सहकार्याबद्दल आभारी आहे.

कळावे. धन्यवाद !

आपला विश्वासू,

प्रा.डॉ. नरेशचंद्र काठोळे
संचालक,
डॉ. पंजाबराव देशमुख आयएएस अकादमी,
अमरावती

Inward No :- 2729
Jr. Clerk
13 JUL 2015
Asst. Registrar Dy. Registrar B.C.U.D. DIRECTOR

BCUD

LMT
Any